***अत्यंत वर्दळ असतानाही प्रामाणिक कर्तव्य करून मुद्देमाल परत केला बाबत***

दि. 24/01/2023 रोजी सकाळ सत्रात पुणे लो.पो ठाणे कडील वाहतूक कर्तव्याचे ए एस आय राठोड, पो हवा १७६ मुसळे पोना 226 भिसे, महिला पोलीस थोरात असे कर्तव्यावर हजर असताना, प्रवासी नामे *कविता निवास पवार* या वाराणसी ते पुणे असा दीनदयाल एक्सप्रेस ने प्रवास करून पुणे रेल्वे स्टेशन येथे आल्यानंतर त्यांच्या जवळ असलेली हॅन्डबॅग ज्यात त्यांचे तीन तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र तसेच एमआय कंपनीचा एक मोबाईल, तसेच सॅमसंग कंपनीचा एक मोबाईल असे पार्किंग परिसरात विसरून घरी पोहोचले होते. त्यांची सदरची सामान असलेली हॅन्डबॅग पोलिस पथकातील asi राठोड यांना सापडल्याने त्यांनी बॅगेमध्ये असलेल्या वस्तुवरून सीसीटीव्ही footage वरुन सदर पोलिस पथकाने *सौ. कविता पवार* यांचा शोध घेतला. त्यानंतर त्यांना बोलावून घेऊन त्यांचे पती नामे निवास पवार यांच्या हाती वरील मुद्देमाल जसा चे तसा परत केला. सदर कामगिरीबाबत त्यांनी *पुणे लोहमार्ग* पोलिसांचे आभार मानले आहे.

